## प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ९३५६ /२०१८,

पुणे शहर, दिनांक - १०.०९.२०१८.

**विषय :- गणपती प्रतिस्थापणा व मुर्ती खरेदीनिमित्त करण्यात आलेली वाहतूक व्यवस्था-**

दिनांक १२/०९/२०१८ व १३/०९/२०१८ रोजी श्री. गणेशाची प्रतिस्थापना निमित्त गणेश भक्त व मंडळे सकाळी ०६-०० ते २४-०० वा.पर्यंत श्रींची मुर्ती खरेदी करीत असतात. चालू वर्षी गणेश मुर्ती विक्रीचे बहुसंख्य स्टॉल हे **डेंगळे पुल ते शिवाजी पुलाचे दरम्यान श्रमिक भवन समोर (आण्णाभाऊ साठे चौक) व कसबापेठ पोलीस चौकी ते जिजामाता चौक ते मंडई पर्यंत** दोन्ही बाजूस असलेने या परीसरातील नागरीकांची गैरसोय तसेच वाहतूकीची कोंडी टाळणेसाठी सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, तेजस्वी सातपुते,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन आवश्यकते नुसार दिनांक १२/०९/२०१८ व १३/०९/२०१८ रोजी सकाळी ०६-०० ते २४-०० वा.पर्यंत वाहतुकीचे बदला बाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित केले आहेत.

---

**अ) वाहतूक व्यवस्था :-**

**शिवाजी रोड** :- गाडगीळ पुतळा चौक ते गोटीराम भैय्या चौक वाहतूकीसाठी बंद करण्यात येत आहे. वाहन चालकांनी खालील मार्गाचा अवलंब करावा.

**पर्यायी मार्ग** :- गाडगीळ पुतळा चौकातून डावीकडे वळण घेऊन

१. संताजी घोरपडे पथावरुन कुंभारवेस चौक, शाहीर अमर शेख चौक मार्गे इच्छितस्थळी जावे.
२. सुर्या हॉस्पीटल समोरुन पवळे चौक, कमला नेहरु हॉस्पीटल समोरुन १५ ऑगस्ट चौक, नरपतगिरी चौक, मार्गे इच्छितस्थळी जावे.
३. शिवाजीनगर कडून शिवाजी रोडने स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी स.गो.बर्वे चौकातून डावीकडे वळन न घेता, सरळ जंगजी महाराज रोडने खंडोजीबाबा चौक, टिळक चौक मार्गे टिळक रोडने जावे.
४. झाशीची राणी चौक ते खुडे चौक ते डेंगळेपुल मार्गे कुंभारवेसकडे जाणा-या वाहन चालकांनी खुडे चौकामधून म.न.पा.पुणे समोरुन प्रिमीयर गॅरेज चौक शिवाजीपुल मार्गे गाडगीळ पुतळा चौक डावीकडे वळन घेऊन कुंभारवेस चौक या मार्गाचा वापर करावा.

१) **कुंभारवेस चौक - डेंगळे पुल, साठे चौक ते कार्पोरेशन ब्रिज (शिवाजी पुल) सर्व प्रकारच्या वाहनांना बंद राहील. तसेच साठे चौक ते धान्य गोडावुन हा रस्ता देखील सर्व प्रकारच्या वाहनांना बंद राहील.**

**पर्यायी मार्ग** :-

१. पुणे स्टेशनकडून कार्पोरेशनकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी शाहीर अमर शेख चौकामधून कुंभारवेस मार्गे न जाता, आर.टी.ओ. चौक, इंजिनीअरींग कॉलेज चौक मार्गे जावे.
२. पुणे स्टेशन परिसरातून फरासखाना परिसरात जाणाऱ्या वाहनचालकांनी कुंभारवेस चौकामधुन डावीकडे वळन घेऊन पवळे चौकमार्गे गणेश रस्त्यावर येऊन इच्छितस्थळी जावे.

२) **सावरकर पुतळा चौक ते समाधान भेळ सेंटर (सिंहगड रोड)**

गणपती विक्री दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूकडील वाहतूक सुरु राहील, परंतू वरील नमुद टप्प्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाहने पार्क होऊ देवू नये.

❖ आवश्यकतेप्रमाणे बॅरिकेडस् व दोरचा वापर करण्यात येईल.

**पार्किंग व्यवस्था :-**

१. मित्रमंडळ चौक ते पाटील प्लाझा कॅनोल पुलापर्यंत
२. जमनालाल बजाज पुतळा ते पुरम चौक रस्त्याचे डाव्या बाजूस
३. निलायम ब्रिज ते सिंहगड रोड जंक्शन

**ब) वाहतूक सुरु असलेले रस्ते :-**

खालील नमुद मार्गावरुन सर्व प्रकारच्या वाहनांकरीता **(जड वाहनांना प्रवेश बंदी)** एकेरी वाहतूक सुरु राहील.

१. फडके हौद चौक ते जिजामाता चौक ते फुटका बुरुज
२. आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक ते मोती चौक
३. सोन्या मारुती चौक ते बेलबाग चौक ते सेवासदन चौक
४. मंगला टॉकिज समोरील प्रिमीयर गॅरेज लेन मूधन शिवाजीरोड ते खुडे चौक

---

**क) पार्किंग व्यवस्था :-**

गणेश मुर्ती खरेदीसाठी येणारे भक्त/मंडळाची वाहने पार्किंगसाठी खालील प्रमाणे व्यवस्था करण्यात येत आहे.

१. न्या.रानडे पथावर कामगार पुतळा चौक ते शिवाजी पुतळा या दरम्यान रस्त्याचे कोर्टाकडील एका बाजूस.
२. वीर संताजी घोरपडे पथावर म.न.पा. बिलभरणा केंद्र ते गाडगीळ पुतळा चौक या रस्त्याचे दोन्ही बाजूस
३. टिळक पुल ते भिडे पुल दरम्यानचे नदीपात्रातील रस्त्यावर
४. मंडई येथील मिनर्व्हा व आर्यन पार्किंग तळावर
५. शाहू चौक (फडगेट चौकी चौक) ते राष्ट्रभुषण चौक :- फक्त रस्त्याचे डावे बाजुस

---

**ड ) पी.एम.पी.एम.एल. बसेसच्या डायव्हर्शनबाबत :-**

१. शिवाजीनगर स्टॅण्डवरुन शिवाजीरोडने स्वारगेटकडे जाणाऱ्या बसेस हया स.गो.बर्वे चौकातून शिवाजीपुलावरुन जाण्याऐवजी स.गो.बर्वे चौकामधून जंगली महाराज रोडने टिळक चौक मार्गे टिळक रोडने स्वारगेटकडे जातील.
२. कार्पोरेशन बसस्टॉप येथून स्वारगेटकडे जाणाऱ्या बसेस ह्या झाशीराणी चौक मार्गे जंगली महाराजरोडने स्वारगेटकडे जातील.
३. कोर्पोरेशन बसस्टॉप येथून पुणे स्टेशनकडे जाणाऱ्या बसेस साठे चौक, कामगार पुतळा मार्गे पुणे स्टेशनकडे न जाता खुडे चौकातून पुणे म.न.पा. समोरुन डावीकडे वळुन शिवाजी चौक स.गो.बर्वे अंडरपास, सिमला ऑफिस चौक, उजवीकडे वळून संचेती अंडरपास, कामगार पुतळा मार्गे शाहीर अमर शेख चौकामूधन पुणे स्टेशनकडे जातील.

---

तरी वरील प्रमाणे वाहतूक व्यवस्थेतील बदल अंमलात आणून वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे, हि विनंती.

( सही/- )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर.